# <u>नागरिकाची सनद</u>

## वित्त विभाग, जिल्हा परिषद, अमरावती

## <u>प्रस्तावना</u>

वित्त विभाग हा जिल्हा परिषदेचा एक अत्यंत महत्वाचा विभाग आहे. जिल्हा परिषदेच्या वार्षिक अर्थ संकल्प तयार करणे व तो अर्थ समितीच्या शिफारशीनुसार जिल्हा परिषदेच्या सर्व साधारण सभेमध्ये सादर करणे. जिल्हा परिषदेच्या आर्थीक बाबीवर सुक्ष्म लक्ष ठेवणे, अर्थोपाय स्थिती योग्य राहण्याच्या दृष्टीने आवश्यक उपाय योजना करणे. जिल्हा परिषदे मार्फत राबविण्यात येणा-या जन कल्याणाच्या विविध योजना राबविण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध असल्याचे खात्री करणे. तसेच जिल्हा परिषदेकडील विविध विभागाकडुन प्राप्त होणा-या गटविमा योजनेची प्रकरणे, भविष्य निर्वाह निधी, निवृत्ती वेतन प्रकरणे, तसेच विविध योजनाचे, विकास कामाचे प्रस्ताव प्रशासकिय व निविदा मंजुरीसाठी अभिप्रायाकरिता प्राप्त झालेल्या प्रस्तावावर शासन मार्गदर्शक सुचना, शासन परिपत्रके, शासन निर्णय व महाराष्ट्र जिल्हा परिषद लेखासंहिता १९६८ नुसार अभिप्राय देवुन सक्षम अधिका-याकडे पाठविणे.

जिल्हा परिषदेकडील वित्त विभागामार्फत नागरीकांना कोणतीही थेट सेवा पुरविली जात नाही तथापी वित्तीय सेवा विषयक बाबीच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेकडील विविध विभागामार्फत उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे नस्ती संदर्भ यांची तपासणी करुन अभिप्राय देणेची कार्यवाही वित्त विभागामार्फत केली जाते. याकरिता विषय निहाय कार्यासनाची निर्मीती करण्यात आलेली आहे.

**स्वा/-**

मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी
जिल्हा परिषद अमरावती

**उद्देश-**

१. विविध आर्थीक बाबी विषयक प्रस्तावावर अभिप्राय देणे- राज्य शासनाकडुन प्राप्त होणारे अनुदान व जिल्हा परिषद निधी यामधुन विविध कामे जिल्हा परिषदेकडील विभागा मार्फत राबविण्यात येतात. सदर कामे व योजना यांची देयके व प्रस्ताव विभागाकडुन प्राप्त झाल्यानंतर शासन मार्गदर्शक सुचना, शासन परिपत्रके, शासन निर्णय व लेखासंहिता नुसार मंजुर करणे व अभिप्राय देवुन सक्षम अधिका-याकडे पाठविणे.

२. निवृत्ती वेतन- जिल्हा परिषदमधुन सेवा निवृत्त झालेल्या कर्मचा-यांचे निवृत्ती वेतन मंजुरीचे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर सदर प्रस्तावाची तपासणी करुन मंजुर असल्यास मंजुरी करीता अथवा आक्षेप असल्यास आक्षेप लावुन प्रस्ताव परत करुन घेवुन व पुर्तता झालेला प्रस्ताव सक्षम अधिका-याकडे पाठविणे.

३.मय्यत कर्मचा-यांच्या प्रदाना बाबत- जिल्हा परिषद कर्मचारी मृत्याु पावल्यानंतर त्यांच्या वारसांना मिळणारे सर्व लाभ तात्काळ वित्त विभागाकडील प्रस्तावांची ज्येष्ठता यादी न पाहता मिळतील याची खात्री करणे.

४.भविष्य निर्वाह निधी- जिल्हा परिषद कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधी मधुन अग्रीम धन काढण्यासाठी प्राप्त झालेले प्रस्ताव व देयकाची तपासणी करुन कर्मचा-यांच्या खात्यावर शिल्लक रक्कम असल्यास महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम १९९८ मधील नमुद तरतुदी नुसार देयक मंजुर पाठविण्यात येते.

५.गटविमा योजना- जिल्हा परिषद मधुन सेवानिवृत्त किंवा मय्यत कर्मचा-यांचे गटविमा मंजुरीचे प्रस्ताव झाल्यानंतर प्रस्तावाची तपासणी करुन योग्यते प्रमाणे निर्णय घेणेसाठी प्रस्ताव सक्षम अधिका-याकडे पाठविणे.

६.अंतर्गत लेखा परिक्षण- अंतर्गत लेखा परिक्षण विभागाकडुन तालुका निहाय लेखापरिक्षण केले जाते. आर्थीक वर्ष संपल्यानंतर लेखापरिक्षण सुरु केले जाते. त्याचप्रमाणे स्थानिक निधी लेखा परिक्षण कार्यालयाकडुन लेखापरिक्षण केले जाते. त्यापुर्वी अर्थ विभागाकडुन लेखापरिक्षण केल्यामुळे आर्थीक कामकाजात झालेल्या चुका, अपुर्ण नोंदी पुर्ण करुन घेणे, अनियमितता झालेली असल्यास वेळीच कार्यवाही करणे, सर्व लेखाविषयक नोंदवहया अद्यावत करणे इत्यादी बाबी पुर्ण केल्या जातात. त्यामुळे स्थानिक निधी लेखा परिक्षणात कमीत कमी आक्षेप येतात.

**स्वा/-**

मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी
जिल्हा परिषद अमरावती

# विभागाचे नाव- वित्त विभाग, जिल्हा परिषद, अमरावती

## कार्यसुची  वेळापत्रक.

| अ.क्र. | विभागाकडुन पुरवली जाणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल | सेवा पुरविणारा अधिकारी / कर्मचारी | सेवा विहीत कालावधित पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल ते अधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | गटविमा योजना | ३ | मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| २ | भविष्य निर्वाह निधी | ४ | उपमुख्य लेखा तथा वित्त अधिकारी | मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी |
| ३ | निवृत्ती वेतन | ५ | उपमुख्य लेखा तथा वित्त अधिकारी | मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी |
| ४ | पुर्व लेखा परिक्षण | ३ | उपमुख्य लेखा तथा वित्त अधिकारी | मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी |
| ५ | प्रस्तावावर अभिप्राय देणे | ३ | मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी | मुख्य कार्यकारी अधिकारी |

**कामाशी संबंधित नियम /अधिनियम**

१. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८
२. शासनाच्या ग्रामविकास विभागाचे शासन निर्णय / परिपत्रक संकेतस्थळ क्र.www.maharashtra.gov.in. वर उपलब्ध आहे.

**स्वा/-**
मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी
जिल्हा परिषद अमरावती